# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीत आतापर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार विधानसभेच्या ९० जागांपैकी भाजपने ४९ जागांवर आघाडी मिळाली आहे. तर मतमोजणीच्या सुरुवातीला काँग्रेस पक्षाला ५१ जागांवर आघाडी मिळाली होती. तर भाजप २७ जागांवर आघाडीवर होता. मात्र मतमोजणीच्या पुढच्या फेऱ्यांमध्ये भाजप उमेदवारांनी आघाडी घेतली आहे.

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचीही मतमोजणी आज होत आहे. जम्मू काश्मीरमध्ये विधानसभेच्या ९० जागांपैकी नॅशनल कॉन्फरन्स ४२ जागांवर, भाजप २२ जागांवर तर काँग्रेस आठ जागांवर आघाडीवर आहे.

****

भारतीय वायू दलाचा आज ९२ वा स्थापना दिन साजरा होत आहे. "भारतीय वायुसेना: सक्षम, सशक्त आणि स्वावलंबी" आहे, जे राष्ट्रीय संरक्षणातील तिचे सामर्थ्य आणि आत्मनिर्भरता दर्शवते, ही वर्धापन दिनाची संकल्पना आहे. चेन्नई इथं हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी वर्धापन दिनाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून परेडचा आढावा घेतला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वायू दलाच्या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय वायुसेनेने उत्कृष्टतेचे सर्वोच्च मापदंड राखले आहेत, त्यांचे धैर्य आणि संकल्प प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर पंतप्रधानांनी आपल्या शुभेच्छांमधून हवाई दल आणि त्यांच्या धाडसाचं, व्यावसायिकतेचं कौतुक केलं आहे.

****

७०व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण होणार आहे. अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना यावेळी दादासाहेब

फाळके पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. याबरोबरच चित्रपट निर्मिती आणि अभिनयासाठीच्या इतर पुरस्कारांचं वितरणही यावेळी होणार आहे. कन्नड चित्रपट कांतारा मधल्या उत्कृष्ट अभिनयासाठी ऋषभ शेट्टीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार तामिळ चित्रपट थिरुचित्रंबलमसाठी नित्या मेनन आणि गुजराती चित्रपट कच्छ एक्सप्रेस साठी मानसी पारेख यांना देण्यात येणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाशिम इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्या बुधवारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

****

नांदेडमध्ये परवा दहा ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महिला सक्षमीकरण मेळावा होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी काल कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर भेट देऊन या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

****

राज्य सरकारनं सर्व सहकारी संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक पुढे ढकलली आहे. विधानसभा निवडणुकीमुळे ३१ डिसेंबरपर्यंत या निवडणुका पुढे ढकलत असल्याचं, याबाबतच्या शासन आदेशात म्हटलं आहे. अडीचशे पेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था आणि न्यायालयाने आदेश दिलेल्या सहकारी संस्थाच्या निवडणुका नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होतील, असंही सरकारनं या आदेशात स्पष्ट केलं आहे.

****

ज्येष्ठ पत्रकार, चित्रपट-समीक्षक आणि लेखिका नीला वसंत उपाध्ये यांचं काल मुंबईत चेंबूर इथं निधन झालं. त्या ७९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

ज्येष्ठ लेखक, गीतकार ग. दि. माडगूळकर यांच्या पुण्यातल्या नियोजित स्मारकासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होण्याकरता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना दिले.

पुण्यात कोथरूड इथं महात्मा सोसायटीजवळ गदिमांचं स्मारक उभारण्याचं काम सुरू असून पहिल्या टप्प्याचं काम जवळपास पूर्ण झालं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या महागामी संस्थेच्या वतीनं तस्मै श्री गुरवे नमः हे वार्षिक सादरीकरण नुकतंच करण्यात आलं. गुरु पार्वती दत्ता यांच्या शिष्यांनी कथक आणि ओडिसी रचनांचा एक अनोखा संग्रह सादर केला. ज्ञानेश्वरीतल्या काही निवडक ओव्या "चंद्र तेथे चंद्रिका" या भक्ती रचनेने या सादरीकरणाचा समारोप झाला.

****

पुण्याच्या क्रीडा विश्वात मानाची समजली जाणारी ३८ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा एक डिसेंबर रोजी होणार असून या स्पर्धेच्या नाव नोंदणीला सुरुवात झाली आहे. स्पर्धा प्रवेशाची अंतिम तारीख 15 नोव्हेंबर आहे. www.Marathon Pune.com या संकेतस्थळावरून प्रवेश अर्ज भरता येईल. ही स्पर्धा पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन, दहा किलोमीटर, पाच किलोमीटर, तीन किलोमीटर आणि दिव्यांग दौड अशा विविध गटात होणार आहे.

****

महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा सामना उद्या श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. दुबई इथं खेळला जाणारा हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल.

****